**मे. कैलासबापू अॅग्रो इंडस्ट्रीज प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, गट नं.९४/२, मुक्काम पोस्ट-मांदुर्णे, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित इथेनॉल १०५.० केएलपीडी क्षमतेचा [मळी (मोलायसेस) / धान्य (ग्रेन)/ ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) वर आधारित] आसवणी प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत —**

---

मे. कैलासबापू अॅग्रो इंडस्ट्रीज प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, गट नं.९४/२, मुक्काम पोस्ट-मांदुर्णे, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नवीन इथेनॉल १०५.० केएलपीडी क्षमतेचा [मळी (मोलायसेस) / धान्य (ग्रेन)/ ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) वर आधारित] आसवणी प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक, २२ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर - गट नं.९४/२, मुक्काम पोस्ट-मांदुर्णे, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना क्रंमाक एस.ओ. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना क्रंमाक एस.ओ. ३०६७ (इ) दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५३/२०२२, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०७१२/एफटीएस-००१७ दिनांक १२-०७-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, जळगाव<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>यांचे प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,नाशिक | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,जळगाव<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगाव | - | **समन्वयक** |

श्री अजय चव्हाण, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगाव यांनी श्री राहूल पाटील, अपर जिल्हादंडाधिकारी, जळगाव तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक (अतिरिक्त कार्यभार) तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री लक्ष्मीकांत सातळकर, प्रांत अधिकारी/उप विभागीय अधिकारी-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, श्री अमोल मोरे, तहसीलदार, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

श्री अजय चव्हाण यांनी सांगितले कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

श्री अजय चव्हाण, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. कैलासबापू ॲग्रो इंडस्ट्रीज प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, गट नं.९४/२, मुक्काम पोस्ट-मांदुर्णे, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, महाराष्ट्र यांचा प्रस्तावित इथेनॉल १०५.० केएलपीडी क्षमतेचा [मळी (मोलायसेस) / धान्य (ग्रेन)/ ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) वर आधारित] आसवणी

प्रकल्प उभारणीच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज दिनांक १८-०४-२०२२ रोजी उप प्रादेशिक कार्यालय, जळगांव यांच्या कार्यालयाला प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ नुसार संवर्ग "अ" मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे परिसरातील नागरीकांवर, पर्यावरणावर होणारे परिणामबाबत व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे इत्यादी असा आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण सल्लागार म्हणून इक्विनॉक्स इन्व्हायरमेंन्टस् इंडिया प्रा.लि., कोल्हापूर या संस्थेची नेमणूक केलीली आहे. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २२-०१-२०२१ रोजी सादर केला व त्या अर्जास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक २३-०१-२०२१ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणीबाबतची सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जळगाव यांनी "सकाळ" या मराठी स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दिनांक २१ जून, २०२२ रोजी व इंग्रजी राष्ट्रीय वृत्तपत्र "द टाइम्स ऑफ इंडिया", औरंगाबाद एडिशनमध्ये दिनांक २२ जून, २०२२ रोजी जाहिर सुनावणीबाबतची सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाच्या इंग्रजी व मराठी प्रती खालील शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये उपलब्ध करण्यात आलेल्या होत्या-

१) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर — ४४० ००१,

२) मा. जिल्हाधिकारी कार्यालय-जळगाव,

३) मा. अपर जिल्हाधिकारी कार्यालय — जळगाव,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, जळगाव

५) महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, जळगाव

६) उप विभागीय अधिकारी, चाळीसगाव, जिल्हा-जळगाव

७) मुख्य अधिकारी, नगरपरिषद कार्यालय,चाळीसगाव, जिल्हा-जळगाव

८) तहसीलदार, तहसील कार्यालय-चाळीसगाव, जिल्हा — जळगाव

९) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय - मांदुर्णे, तालुका — चाळीसगाव, जिल्हा — जळगाव

१०) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई

११) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.

१२) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.

१३) उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हॉल "ए", ३रा मजला, जुने बी. जे. मार्केट, जळगाव-४२५ ००१

१४) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शीव, मुंबई

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आजपर्यंत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जळगाव येथे सदरहून प्रकल्पाबाबत ई-मेल द्वारे दोन निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

समन्वयक यांनी पुढे सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनाणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे भारत सरकारला सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेते.

श्री अजय चव्हाण, समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या प्रकल्पाची जनसुनावणी यापूर्वी १८ मे, २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने झालेली होती. त्यावेळेस करोनाचा प्रादुर्भाव असल्याने भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांनी पारित केलेल्या विविध निर्देशांनुसार जिल्हाधिकारी कार्यालय-जळगाव येथे ऑनलाईन पध्दतीने जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली होती व सदरहू जनसुनावणी संपन्न झाल्यानंतर प्रकल्प प्रस्ताव हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या तज्ज्ञ समितीस सादर करण्यात आला. सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी प्रदान करण्यात आलेली होती, परंतु पर्यावरण अनुमती प्रदान झाल्यानंतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथील विधी समितीने याबाबत वेगळे मत व्यक्त केले व प्रकल्प स्थानावर प्रत्यक्ष जनसुनावणी घेणे आवश्यक असल्याचे मत दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी दिल्याने सदरची जनसुनावणी आयोजित करण्यात आली व त्यासाठी आज आपण परत एकत्र आलेलो आहोत.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबतचे सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी, कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी याबाबत सविस्तरी माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास अंदाजे

१०८.० कोटी रुपयांची गुंतवणूक/खर्च प्रस्तावित असून सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज (झेडएलडी) प्रकल्प आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले:-

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहेः-**

१) **श्री बी.आर.पाटील, राहणार-ब्राम्हणशेवगे, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगावः-**

**प्रश्न**:- सदरहू प्रकल्प हा वर्षभरात किती दिवस चालेल?

**उत्तर**:- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वर्षात ३६५ दिवस असतात. मात्र देखभालीसाठी म्हणजे प्रकल्पातील विविध यंत्रांची देखभाल, त्यांची दुरुस्ती, ऑईलिंग यासाठीचे दिवस वगळून आपला कारखाना हा वर्षात ३३० दिवस कार्यरत राहणार आहे.

२) **श्री सुरेश सुभाष पाटील, राहणार-मांदुर्णे गांव, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव-**

**प्रश्न**:- सादरीकरणात असे दर्शविण्यात आले की मांदुर्णे गावात हा प्रकल्प होत असून प्रकल्पापासून कोणताही प्रदूषणाचा त्रास होणार नाही. मांदुर्णे गावातील स्थानिक युवक युवतींना रोजगार मिळेल. तर स्थानिक लोकांना किती प्रमाणात (टक्केवारी) रोजगार उपलब्ध होईल याची माहिती देण्यात यावी व भविष्यात या मांदुर्णे गावाला कंपनीच्या प्रदूषणापासून धोका होणार नाही याबाबत माहिती देण्यात यावी.

**उत्तर**:- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पाचे अध्यक्ष हे स्थानिक असून त्यांनी कारखान्यामुळे माझ्या गावातील रहिवाशांना कोणाताही त्रास होणार नाही यादृष्टीनेच कारखान्याची आखणी व नियोजन करण्याच्या सूचना सुरवातीपासूनच दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रकल्पात सर्व आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा स्थापित करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्पात Continuous Online Monitoring System जी (२४X७ -२४ तास दिवस) कार्यान्वित करण्यात येणार असून ती नवी दिल्ली येथील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व मुंबई येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला जोडल्यामुळे पारित मानकांपेक्षा जास्त पाण्याचे व हवेचे उत्सर्जन झाल्यास लगेचच प्रकल्प अधिकारी व प्रकल्प सल्लागार यांच्या मोबाईलवर

एसएमएसव्दारे सूचना करण्यात येते. त्यामुळे परिसरातील जनतेस कोणताही त्रास होण्याअगोदरच त्याबाबतची पुर्व सुचना कारखाना मालकास मिळते त्यामुळे प्रदूषणाची अवास्तव भिती बाळगण्याची गरज नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की प्रकल्पाचे अध्यक्ष यांनी प्रकल्पाची आखणी करतानाच सांगितलेले आहे की प्रकल्पातील विविध संवर्गातील ८५% पदांवर स्थानिक युवक युवतींना प्राधान्य देण्यात येईल. मात्र अतिकुशल संवर्गातील पदांवर जर स्थानिक उमेदवार उपलब्ध न झाल्यास दुस-या गावातील किंवा बाहेरील भागातील व्यक्तीस रोजगाराची संधी देण्यात येईल.

३)**<u>श्री सतिश पाटील, राहणार-कळवाडी, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगावः-</u>**

**प्रश्नः-** बॉयलरमध्ये कोणत्या प्रकारचे इंधन वापरले जाणार आहे? प्रकल्पातील प्रदूषणासाठी कोणती प्रदूषण नियंत्रक उपकरणे वापरण्यात येणार आहे?

**उत्तरः-** पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात ३० टन प्रति तास वाफ निर्मिती करणारा बॉयलर आहे. कारखान्यात बगॅस, बायोमास व बायोगॅस हे इंधन म्हणून वापरण्यात येईल. स्पेंट वॉशपासून जो गॅस निर्माण होईल, तो जाळण्यात येईल. ते क्लीन इंधन आहे.

बगॅस जाळल्यामुळे राख उत्पन्न होते. एक टन बगॅस जाळला तर दोन टन वाफ मिळते. तर राखेचा अटकाव करण्यासाठी, धुलीकणंचा अटकाव होण्यासाठी बॉयलरला अत्याधुनिक असणारे ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रेसिपरेटर) हे प्रदूषण नियंत्रक उपकरण कार्यान्वित करण्यात येणार आहे. ईएसपीची कार्यक्षमता ही ९९.९% असते व त्यास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी मान्यता दिलेली आहे. बॉयलरला ५० मीटरची चिमणी लावण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील हवेच्या गुणवत्तेत काहीही फरक पडणार नाही. त्यामुळे बॉयलर चालू असताना धुराचा त्रास होणार नाही व बॉयलर चालू असल्याची जाणीवही होणार नाही.

४) **<u>श्री मनिष सूर्यवंशी, राहणार-टाकळी, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगावः-</u>**

**प्रश्नः-** हा इथेनॉल प्रकल्प उभारणी करण्यासाठी आपणास किती खर्च अपेक्षित आहे, किती लागणार आहे?

**उत्तर**:- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आमच्या प्राथमिक खर्चाचा अंदाजानुसार अंदाजे एकशे आठ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. करोनाच्या पार्श्वभुमीवर व स्टीलची किंमत वाढल्याने अंदाजे दहा कोटी रुपये वाढू शकतात. त्यामुळे अंदाजे एकशे चौदा कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

५) **श्री प्रवीण सुभाष पाटील, राहणार-मांदुर्णे गांव, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव-**

**प्रश्न**:- प्रकल्पात उत्पन्न होणा-या औद्यागिक सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावणार?
**उत्तर**:- प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारा स्पेंट वॉश शत्रू व मित्र दोन्हीही आहे. स्पेंट वॉश मोलॅसिस व ज्युस वापरताना तो घनस्वरुपात रुपांतरित होईल. स्पेंट वॉशची ड्राय पावडर तयार करण्यात येईल किंवा धान्य असताना डीडीजीएस म्हणून वापरण्यात येईल. भारत सरकारने आसवणी प्रकल्प कार्यान्वित करताना झेडएलडी - शून्य द्रव निःस्सारण -Zero Liquid Discharge ही पहिली अट पारित केलेली आहे. त्यास प्रकल्प प्रवर्तक बांधिल असून जल प्रदूषणाचा परिसरात त्रास होणार नाही. प्रकल्पात उत्पन्न झालेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

श्री प्रवीण पाटील यांनी पुढे आक्षेप नोंदविला की प्रकल्पात उत्पन्न होणारे औदयोगिक सांडपाणी काही कारणाने किंवा अपघाताने जर जमिनीत मिसळले, मुरले तर जमिनीतून आजूबाजूच्या बोअरविहिरीत, विहिरीत जर मिसळले तर त्याबाबत काय उपाययोजना करण्यात येतील.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की स्पेंटवॉशची सिमेंटप्रमाणे ड्राय पावडर करण्यात येईल. प्रकल्पाच्या चारी बाजूस जे ट्युब वेल टाकणार, त्यास सेन्सर्स, प्रिझोमीटर्स लावण्यात येणार आहेत. अपघात हे होऊ शकतात. त्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन योजना – (Disaster Management Plan) तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे जल प्रदूषण होणार नाही. काही कारणांमुळे अपघात झाल्यास त्वरित देखरेख (Monitoring) करण्यात येईल व नंतर प्रकल्पातील आपत्कालीन यंत्रणा ही त्वरित कार्यान्वित करण्यात येईल, अशी तीन टप्प्यातील यंत्रणा असेल. सदरहू योजना ही भारत सरकारच्या पर्यावरण,वने व हवामान विभागास सादर करण्यात आलेली असून त्यास मंजूरीही प्रदान करण्यात आलेली आहे.

एक लिटर अल्कोहोलसाठी दहा लिटर ताजे पाणी वापरण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे परंतू त्याठिकाणी प्रकल्पात फक्त एकलिटर अल्कोहोल तयार करण्यासाठी १.२ लिटर पाणी वापरणार, कारण प्रकल्पातील कामगारबंधुना पिण्यासाठी व इतर वापरासाठीही पाणी लागेल. प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी सीपीयुत प्रक्रिया करुन त्याची उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल. प्रकल्पात 3 R's – Reduce, Reuse and Recycle हे ध्येय पूर्णपणे राबविण्यात येणार आहे.

६) **श्री भरत गायकवाड, राहणार-मांदुर्णे गांव, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगावः-**
**प्रश्नः-** प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियांमुळे परिसरातील लोकांना दुर्गंधीचा त्रास होईल काय व त्याबाबत उपाय योजना काय आहेत?

**उत्तरः-** प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एखादी ऑरगॅनिक वस्तू कुजायला लागली की दुर्गंधी येते. म्हणजे कंपोस्ट यार्ड वगैरे. प्रकल्पात दुर्गंधी येण्याचे स्त्रोत आहेत. सांडपाणी स्लज किंवा डीडीजीएस आहे. तर प्रकल्पातील त्या पदार्थांचे पाणी काढणार व तो पुर्णपणे सुका होणार आहे. त्यामुळे त्यात किण्वन (fermentation) होणार नाही. तर सुका केलेला पावडर स्वरुपातील स्पेंट वॉश गरजुंना विकणार आहोत. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उपस्थित प्रश्नकर्त्याने पूर्वीचे ओपन कंपोस्टींग पाहिलेले आहे. तसे या प्रकल्पात होणार नाही. तर उपस्थितांना जी दुर्गंधीची भिती वाटते, तो पदार्थ विकण्यात येणार आहे.

७) **श्री सुनील सुभाष पाटील, राहणार-मांदुर्णे गांव, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव-**
**प्रश्नः-** हा प्रकल्प ग्रामीण भागातच का होतो? असा प्रकल्प आजूबाजूच्या परिसरात झालेला आहे का?

**उत्तरः-** पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आपण ऊसाचे, धान्याचे पीक पिकवतो, त्यास बाजारपेठ लागते. या प्रकल्पामुळे स्थानिक शेतक-यांच्या पिकाला ताबडतोब उठाव मिळेल व त्वरित परतावा मिळेल. शेतक-यांच्या दारात प्रकल्प आलेला आहे, त्याचा स्थानीक शेतक-यांना फायदाच होणार आहे. अशा प्रकारचे अनेक प्रकल्प आता भारतात सुरु होत आहेत. भारत सरकारने इथेनॉल पेट्रोलबरोबर एकत्रित करण्याचे धोरण आखलेले असल्याने या प्रकल्पास खूपच मागणी आहे.

८) **श्री राजेन्द्र पाटील, राहणार-देवळी गाव, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगावः-**

**प्रश्नः-** कारखाना म्हटले की आवाजाचा त्रास होतो. तर प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमुळे परिसरातील रहिवाशांना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होईल काय?

**उत्तरः-** प्रकल्पातील ध्वनी प्रदूषणाचे स्त्रोत आहेत बॉयलर, कॉम्प्रेसर आणि टरबाईन. प्रकल्पात आधुनिक ध्वनिप्रतिबंधक यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे कारखान्यात ध्वनि प्रदूषणाची पातळी ही भारत सरकारने औद्योगिक क्षेत्रास पारित केलेल्या मानकांप्रमाणेच राहिल. त्यामुळे ध्वनि प्रदूषणाची भिती बाळगू नये.

९)**श्री युवराज पाटील, राहणार-सायगाव,तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगावः-**

**प्रश्नः-** ह्या प्रकल्पाची उभारणी ही स्थानिक लोकांसाठी एक आनंदाची गोष्ट आहे. तर हा प्रकल्प अंदाजे किती अवधीत कार्यान्वित करण्यात येईल? श्री युवराज पाटील यांनी पुढील प्रश्न विचारला की जनसुनावणी बैठकीत कारखान्यातील सर्व संवर्गातील ८५% पदांवर स्थानिकांना रोजगाराची संधि देण्याचा प्रस्ताव ही निश्चितच स्वागतार्थ आहे. जनसुनावणीत जे सादरीकरण करण्यात आले, त्यात आम्हांला काहीही आक्षेपार्ह वाटत नाही. तरी आपण जी भूमिका घेतलेली आहे, त्यास प्रशासनाने शेवटपर्यंत ठाम राहावे.

**उत्तरः-** पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हा प्रकल्प फास्ट ट्रॅकवर ठेवण्यात येईल. काही तांत्रिक अडचणी येऊ शकतात. पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर अकरा महिन्यांतच प्रकल्प कार्यान्वित करण्याचा प्रकल्प प्रशासनाचा मानस आहे.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की स्थानिकांनी कारखान्याने घेतलेल्या भूमिकेशी भविष्यात वचनबध्द राहावे ही केलेली सूचना स्वागतार्ह आहे. कारखाना प्रशासन आपल्या भूमिकेवर ठाम आहे. आम्ही पाळणार आहोत. पण त्यावरही देखरेख व नियंत्रण आहे. ते प्रदूषण नियंत्रण मंडळ करत असते.

१०) **समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समितीः-**

**प्रश्नः-** जी १०५ क्षमता दर्शविली आहे. ती तिन्ही उत्पादनाची एकत्रित आहे की तिन्ही उत्पादनाची वेगळी आहे.

**उत्तरः-** पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले कच्चा माल एकच होणार आहे. जरी ज्युस व धान्याला पाणी कमी लागते, तरीही मोलॅसिसला धरुनच पाण्याचे नियोजन करण्यात आले.

११) **श्री चंद्रशेखर, पर्यावरण कार्यकर्ता, हैद्राबादः-**

**प्रश्नः-** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत मी दोन शब्द बोलतो. प्रकल्प परिसरात व जवळील गावात वृक्षारोपण करण्यात यावे. स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात यावी. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांना त्यांच्या सूचना ह्या लेखीस्वरुपात सादर करण्यास सांगितले.

**उत्तरः-** समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सूचना. आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना जनसुनावणीच्या समारोपासाठी दोन शब्द बोलण्याची विनंती केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी अतिशय चांगल्या प्रकारे सूचना, प्रश्न विचारल्याचे व त्यास पर्यावरण सल्लागार यांनी योग्यप्रकारे उत्तर दिल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्ष यांनी सांगितले की याशिवाय कोणालाही लेखी स्वरुपात निवेदन सादर करायचें असल्यास ते अर्धा तासापर्यंत पर्यावरण समितीस सादर करु शकतात. त्याची नोंद इतिवृतात घेण्यात येईल. त्यांनी मत मांडले की आपल्या परिसरात औद्योगिक विकास, कारखानदारी ही कमी प्रमाणात आहे. तर त्यासाठी विविध प्रकल्पांची आवश्यकता आहे. बैठकीत सांगितल्याप्रमाणे रोजगाराबाबत स्थानिकांना प्राधान्य व प्रकल्पात उत्पन्न् होणारे सांडपाणी हे प्रकल्पाबाहेर जाणार नसल्याचे धोरण जर प्रकल्प प्रवर्तकांनी तडीस नेले तर लोकांना जे अपेक्षित आहे, ते साध्य होईल. परिसरातील शेती, पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होऊ नये हाच स्थानिकांचा मुख्य उद्देश आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पाजवळ गावे असल्याने उपस्थित करण्यात आलेली दुर्गंधीबाबतची सूचना विचारात घेऊन हरितपट्टा विकसित करण्यात यावा. जनसुनावणीदरम्यान एक लेखी निवेदन प्राप्त झाले.

अध्यक्ष यांनी श्री लक्ष्मीकांत सातळकर, प्रांत अधिकारी/उप विभागीय अधिकारी-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, श्री अमोल मोरे, तहसीलदार, तालुका-चाळीसगाव, जिल्हा-जळगाव, सर्व शासकीय अधिकारी, म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी व कर्मचारी, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न् झाल्याचे जाहीर केले. प्राप्त झालेली तीन लेखी निवदने/सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**(अजय चव्हाण)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगाव

**(रविंद्र आंधळे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

**(राहुल पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, जळगाव,
जिल्हा-जळगाव